कार्यवाह
शांताराम पंदेरे
चव्हाण निवास
खोकडपुरा
औरंगाबाद ४३१ ००१

सहकार्यवाह
मधु मोहिते
पोतदार बिल्डिंग
शास्त्रीनगर कळवा,
जि. ठाणे ४०० ६०५

मध्यवर्ती कार्यालय
द्वारा : अजित सरदार
राही चेंबर्स,
२० सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०
फोन : ५८८०९

युक्रांद

# युवक क्रांती दल, महाराष्ट्र

जावक क्र.

दिनांक २३ जानेवारी १९९०

मा. संपादक

दैनिक , महोदय ,

युवक क्रांतीदलाच्या मध्यवर्ती कार्यकारिणीची बैठक ता. २१ जाने. रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आली होती त्यात संमत झालेला ठराव खाली देत आहोत त्यास आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्दि द्यावी ही विनंती.

आपला

कार्यवाह , युवक क्रांती दल , महाराष्ट्र

कृपया प्रसिध्दिसाठी

**नव्या रिपब्लिकन पक्षाने पुरोगामी आणि क्रांतीप्रवण प्रवाहच्या बाजूने उभे रहावे.**

रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटांच्या व नवबौध्द समाजातील समाजातील संघटनांच्या ऐक्याची प्रक्रिया महाराष्ट्रात सुरु झालेली आहे. यातून एक व्यापक रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचा संकल्पही या दलित नेत्यांनी केला आहे. या नव्या पक्षाचा आधार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रिपब्लिकन पक्ष स्थापनेच्या निमित्ताने त्यावेळच्या समाजवादी पक्षाच्या नेत्यांबरोबर ( श्री. जयप्रकाश नारायण , श्री. राममनोहर लोहिया, श्री. एस. एम. जोशी , श्री. मधु लिमये , वि. ) केलेल्या पत्रव्यवहारातील विचार व कल्पनांचा आहे. असेही त्यांनी घोषित केले आहे. म्हणून आम्ही या ऐक्य प्रक्रियेचे स्वागत करीत आहोत .

ही ऐक्य प्रक्रिया विशिष्ट जातीपुरता किंवा रिपब्लिकन पक्षापुरतीच मर्यादित ठेवता या देशातील शोषित-पिडीत आणि कष्टकरी या सर्व घटक व जाती-जमातींचा समावेश तिच्यात करावा. सर्व शोषितपिडितांची क्रांतिकारक एकजूट ही प्रदिर्घ प्रक्रिया आहे, आणि तिच्यात अनेक अडीअडचणी आहेत याची आम्हाला जाणिव आहे. परंतु आज घडत असलेले प्रयत्न त्या दिशेने टाकलेले पहिले पाउल ठरेल अशी आशा आम्हाला वाटते.

स्वातंत्र्यपूर्व काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मजूर पक्षाचा जाहिरनामा व रिपब्लिकन पक्ष स्थापनेच्या वेळचा पत्र व्यवहारातून व्यक्त झालेले त्यांचे विचार आणि पक्षाविषयीच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट दिशा

दर्शवितात. त्या मूर्त स्वरूपात आणण्याचे प्रयत्न करणे. हेच त्यांच्या विचारचा महान वारसा सांगणाऱ्यांचे प्रधान कर्तव्य आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. रिपब्लिकन पक्षातही कमीअधिक प्रमाणात प्रस्थापित पक्षाकडे कल असलेले विविध विचार प्रवाह आहेत. परंतु या विचारांशी प्रतारणा करणाऱ्या नेत्यांचीही जनतेने गय करता कामा नये .

गेल्या ४० वर्षात कॉंग्रेस पक्षाने केलेले राजकारण आणि वेळोवेळी घेतलेल्या भूमिका पाहिल्या तर दलित, आदिवासी, भटकेविमुक्त, व इतर कष्टकरी घटक समूहात फोडाझोडा तंत्रा चा अवलंब करून भेदनितिचा अंगिकार केला. त्याचा एक भाग म्हणूनच देशातील प्रत्येक राज्यातील जातियवादी व कडव्या धर्मवादी संघटनांना हाताशी धरून आपल्या राजकीय स्वार्थासाठी त्यांचा वापर केला व त्यांनीही तो करून दिला. आणि या जनतेला परस्परात झुंजवत ठेवले .

महाराष्ट्रात शिवसेना, मराठा महासंघ, व हिंदू एकता, इ. संघटना कॉंग्रेसच्या आश्रयाने निर्माण झाल्या आणि वाढलेल्या संघटना आहेत, हे उघड गुपित आहे. शिवसेना-भाजप यांच्या युतिच्या माध्यमातून जातियवादाचे आव्हान उभे राहिले आहे असे म्हटले जाते ते म्हणजे कॉंग्रेसच्या आजवर अंगिकारलेल्या छुप्या जातियवादाचे मुर्तिमंत प्रतिक आहे. त्यांच्यात एक-दोन असे नंबर लावणे धोकादायक व भ्रामक ठरेल.

समाजातील दलित, आदिवासी, भटकेविमुक्त, आदि. उपेक्षित घटक आणि शेतकरी-शेतमजूर व इतर कष्टकरी समूह यांची खऱ्या अर्थाने पुरोगामी व क्रांतीप्रवण रहावे असे वाटत असल्यास आपले स्वतंत्र राजकीय अस्तित्व ठेवून राष्ट्रीय आघाडीच्या स्वरूपात जनता दलाच्या नेतृत्वाखाली देशात घडत असलेल्या राजकीय परिवर्तनाच्या बाजूने उभे राहून कॉंग्रेसच्या भांडवली केंद्रिकरणाच्या आणि जातियवादी राजवटीचा अंत घडवून आणणे आवश्यक आहे. आपले तात्कालिक राजकारण करीत असताना आपल्या नजिकच्या व दूरगामी उद्दिष्टांचा मेळ घालणे , डोळसपणे व कल्पकतेने आपली चळवळ पुढे नेणे आवश्यक आहे.

या आमच्या भूमिकेशी संबंधित रिपब्लिकन पक्षाच्या नेतृत्वाने गंभीरपणे विचार करावा असे आवाहन युवक क्रांती दलाची मध्यवर्ती कार्यकारिणी करीत आहे.

------ooooooooo ------